-: **प्रेसनोट** :-

**सांगवी पोलीस ठाणे हद्दित राहणारा कुप्रसिध्द गुन्हेगार, अक्षय ऊर्फ जोग्या हेमंत जाधव यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. अंकुश शिंदे सो, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्दतेचे आदेश दिले.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दित गुन्हे करणारे गुन्हेगार यांचा अभिलेख तपासून त्यांचेवर मोका व एमपीडीए कायद्या अंतर्गत परीणामकारक कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी दिलेले असून त्याप्रमाणे कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सांगवी पोलीस ठाणेचे हद्दित कोयता सारखी जीवघेणी हत्यारांसह दरोडा, दुखापत, जबरी चोरी व बेकायदेशीररित्या विनापरवाना घातक शस्त्रे जवळ बाळगणे,यासारखे गुन्हे करणारा कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **अक्षय ऊर्फ जोग्या हेमंत जाधव, वय २५ वर्षे, रा. महादेव मंदिराशेजारी, जुनी सांगवी, पुणे.** यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री.अंकुश शिंदे, सो, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे, येथे दिनांक ०८/०९/२०२२ रोजी सदर कायद्यान्वये स्थानबध्द करण्यात आले आहे.

कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **अक्षय ऊर्फ जोग्या हेमंत जाधव, वय २५ वर्षे, रा. महादेव मंदिराशेजारी, जुनी सांगवी, पुणे.** याने सांगवी पोलीस ठाणेचे हद्दित सन २०१९ पासून आत्तापर्यंत ११ गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्याच्या गुन्हयांचा चढता आलेख पाहून तसेच मा. पोलीस आयुक्त सो. यांचे आदेशा नुसार व.पो.नि. श्री. सुनिल टोणपे, सांगवी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पो.ना. डंगारे, यांचे पथकाने त्याचेवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई करणे कामी प्रस्ताव श्री. श्रीकांत दिसले, सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, श्री. आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, मा. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो. यांचे मार्फतीने मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे सादर केला होता.

सदर प्रस्ताव त्रुटी विरहित तसेच परिपूर्णरित्या सादर करण्याची कामगीरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे, डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पोलीस हवालदार, सचिन चव्हाण, पो.ना. कारभारी पी.सी.बी. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड.

CamScanner